**अधीकची उर्वरीत सरतपासणी वादीतर्फे विधिज्ञ श्री. एच. ए. वाघ यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

०१. मी दस्तऐवज यादी नि.क्र.२२ खाली माझे वडील नारायण गोविंद खांडेकर यांचे मृत्यू दाखल्याची पडताळलेली प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१०५** देण्यात येतो.

०२. मी दस्तऐवज यादी नि.क्र.७५ खाली प्रतिवादी क्र.०१ याला दि.२२/११/२०१७ रोजी माझे विधीज्ञांमार्फत पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर स्थळप्रतीवर माझा अंगठा असून माझे वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०६** देण्यात येतो. सदर नोटीस प्रतिवादी क्र.०१ ला पोष्टाने पाठविल्याबाबत पोष्टाची पावती मी दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१०७** देण्यात येते.

०३. पुढे मी दस्तऐवज यादी नि.क्र.७७ खाली प्रतिवादी क्र.०१ ला पाठविलेल्या नोटीसचा पोष्टाचा लखोटा परत आल्याबाबत तो पोहोच पावतीसह अभिलेखावर दाखल केला. सदर लखोटा उघडून बघीतला असता त्यामध्ये नोटीस नि.क्र.१०७ असल्याचे दिसून पडते. त्यास **नि.क्र.१०८** देण्यात येते.

०४. पुढे मी दस्तऐवज यादी नि.क्र.९४ खाली मौजे पहूर येथील गट क्र.८०५ या जमिनीचा ७/१२ उता–याची साक्षांकीत प्रत, फेरफार क्र.१, ५७६, ६०९, ६४४, ८६०, ११९२, १२१०, १३०९, १३१०, १३११, १३१३, १३१४, १३१५, १३१६, १३१७ व १४४९ यांच्या साक्षांकीत प्रती दाखल केल्या आहेत. सदर दस्तांना **नि.क्र.१०९ ते १२६** देण्यात येते.

**सरतपासणी पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत यांचे तोंडी विनंती वरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब....**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.06.26 16:34:28 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि. २६.०६.२०२४ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रोहा.